# सोलापूर विद्यापीठ,सोलापूर

## विद्यार्थ्यांचे पदवीप्रमाणपत्र आधार कार्ड क्रमांकाद्वारे ऑनलाईन उपलब्ध होणार

सोलापूर विद्यापीठाचा १२ वा दीक्षांत समारंभ हा सर्वसाधारण माहे डिसेंबर,२०१६ मध्ये संपन्न होणार आहे. विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन प्रणालीव्दारे विहित नमुन्यातील पदवीप्रमाणपत्रासाठीचे अर्ज आवश्यक त्या शूल्कासह ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून अर्ज ऑनलाईन भरण्याची मुदत दिनांक २० ऑक्टोबर २०१६ पर्यंत असून सदर अर्ज छपाई केल्यावर अर्जाची (Hard Copy) विद्यापीठात जमा करण्याची अंतिम मुदत दिनांक ०३ नोव्हेंबर २०१६ पर्यंत आहे. नमूद केलेल्या दिनांकानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, यांची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. पदवी प्रमाणपत्राकरीता आवश्यक असणारे शुल्क रू.६००/- इतके असून ते फक्त Debit Card/Credit Card/Net Banking द्वारे ऑनलाईन भरता येणार आहे.

या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना आधार कार्ड क्रमांकाची नोंदणी ऑनलाईन अर्जामध्ये करणे आवश्यक आहे. दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र हे विद्यार्थ्याच्या आधार कार्ड क्रमांकाशी लिंक करण्यात येईल. विद्यार्थ्याच्या ऑनलाईन अकाऊंटमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील पदवी प्रमाणपत्राची प्रत डिजीटल स्वाक्षरीसह उपलब्ध होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांने आधार कार्ड क्रमांकाची नोंदणी अचूक करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी लॉगीनद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करताना अलीकडील फोटो व सही अपलोड करणे, पदवी प्रमाणपत्र टपालाद्वारे मिळविण्याकरिताचा संपुर्ण पत्ता, पिन कोड, एसएमएस प्राप्त होण्यासाठी Mobile No. अद्यावत करणे आवश्यक आहे. ही सर्व माहिती अद्यावत केल्यामुळे दीक्षांत समारंभाची माहिती विहित वेळेत विद्यार्थ्यांना प्राप्त होवू शकेल. ऑनलाईन पध्दतीने दीक्षांत समारंभासाठी अर्ज भरण्यासंबधीची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळ Su.digitaluniversity.ac यावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी संकेस्थळावर दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. कुठल्याही परिस्थितीमध्ये विहित मुदतीनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी .

विद्यार्थ्यांना अर्ज सादर करतेवळी काही अडचणी आल्यास दूरध्वनी क्रमांक ०२१७-२७४४७६५ व्हॉटस ॲप क्र. ९१३००१३०९१ व ई-मेल आयडी convocation@sus.ac.in यावर संपर्क करावा. तरी सर्व विद्यार्थ्यांनी आधार कार्ड क्रमांकाची नोंद ऑनलाईन अर्जात अचूकपणे करून उपलब्ध करून देण्यात येणा-या सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन परीक्षा नियंत्रक श्री. बी. पी. पाटील यांनी केले आहे.

**(बी. पी. पाटील)**
परीक्षा नियंत्रक